# देवाचा कुंचला

लीनोर लुक आणि मिलो सो



# लेखकाचे मनोगत

*वू दाओजी* (689-759) हे चीनचे महान चित्रकार मानले जातात. *तांग* राजघराण्याच्या काळात (618-907) त्यांना चित्रकलेतील महर्षी समजले जात असे. त्यांनी चित्रांमध्ये हालचालींचा भास उत्पन्न केला. त्यांच्या चित्रांतील माणसांच्या अंगावरील वस्त्रे जणू वाऱ्याने हलत आहेत आणि त्यांचे केस जणू वाऱ्यावर उडत आहेत, असे वाटे. त्याकाळी *हस्ताक्षरकला (कॅलिग्राफी)* ही सर्वोच्च कला मानली जात असे. पण वू दाओजीने चित्रकलेकडे बघण्याचा लोकांचा दृष्टिकोन बदलला. त्याच्या समकालीन लोकांनी कविता आणि लेखांमधून त्याची खूप स्तुती केली. त्यानंतरच्या काळात मात्र त्याच्याबद्दल फारसे काही लिहिले गेले नाही.

तांग राजघराण्याची पश्चिमेकडील राजधानी *चँगन* (आजचे *शिआन*) शहराच्या परिसरातील मठ, राजवाडे आणि मंदिरे यांच्या भिंतींवर वू दाओजीने बरीच चित्रे काढली. त्याने *फ्रेस्को* (भिंतिच्या ओलसर गिलाव्यावर काढलेले चित्र) पद्धतीची सुमारे 300 चित्रे आणि *स्क्रोल* (गुंडाळीवर रंगवलेले चित्र) पद्धतीची सुमारे 100 चित्रे काढली. दुर्दैवाने, त्याच्या फ्रेस्को चित्रांपैकी एकही चित्र आज उपलब्ध नाही.

तांग घराण्याच्या काळातील कविता आणि लेख यांची भाषांतरे तसेच चँगन शहराच्या जनजीवनाबाबत मिळालेली माहिती यांच्या आधारे मी वू दाओजीचे जीवन आणि कार्य याची ही कल्पित कथा रचलेली आहे.

# देवाचा कुंचला





वू दाओजीने कुंचला (ब्रश) हातात घेतला आणि त्याच्या मुलायम केसांचा मऊ स्पर्श अनुभवला. केसांच्या स्पर्शाने त्याला गुदगुल्या झाल्या.

"ब्रश ओला कर," भिक्षुक असलेले दाओजीचे वयोवृद्ध शिक्षक कठोरपणे म्हणाले.

दाओजीने श्वास रोखून धरला आणि ब्रश समोरच्या बशीतील पाण्यात बुडवला.



"आधी शाई भरडून घे," शिक्षक ओरडले.

शिक्षकांनी हे पूर्वी शिकवले होते. पण त्यावेळी दाओजीचे त्यांच्याकडे लक्ष नव्हते. आता तो इतर मुलांचे निरीक्षण करू लागला आणि त्यांची नक्कल करू लागला.

इतर मुलांनी एका सपाट दगडावर पाण्याचे काही थेंब टाकले. मग ते शाईची वडी दगडावर पुढे-मागे घासू लागले. हळूहळू दगडावर शाईचे काळे बिंदू दिसू लागले.





शिक्षकांनी एक जुने कासवाचे कवच घेतले. “ब्रश असा हलकेच दाबायचा,” म्हणत त्यांनी कवचावर डावीकडून उजवीकडे सरळ रेषा काढली. त्यावर चीनी भाषेत चमकदार *एक* हा अंक लिहीला.

“कॅलिग्राफी ही सर्वोच्च कला आहे,” आणखी काही अंक कवचावर रंगवत ते म्हणू लागले. “हस्ताक्षरावरून आपलं चारित्र्य कळतं. सुंदर हस्ताक्षर आपल्या घराण्याला भूषणावह ठरतं.”

“ताठ बस,” शिक्षक पुन्हा कडाडले. दाओजी सरळ होऊन ताठ बसला.

“ब्रश नाकासमोर सरळ रेषेत धर,” शिक्षक म्हणाले.

दाओजीने मान पुढे केली. आता त्याचे डोके हातातील ब्रशच्या थेट वर चंद्रासारखे दिसू लागले. मग त्याने आपले डोळे खाली नाकावर रोखले.

दाओजीने श्वास रोखून धरला. त्याच्या ब्रशच्या मऊशार केसांनी सरपटणारे किडे काढले.

शिक्षकांनी विचारले, “हे काय काढलंयस?”

“किडे,” दाओजी उत्तरला.

“किडे!”



काही क्षण शांतता.

“दाओजी, तुझे हे किडे फारच सुंदर आहेत, पण आधी अक्षरं काढायला शिक.”

दाओजी पुन्हा प्रयत्न करू लागला. यावेळी त्याच्या ब्रशने गवताचे पाते काढले. ते पाहून इतर मुले फिदीफिदी हसू लागली.

“आणखी प्रयत्न कर,” शिक्षक म्हणाले.

दाओजी पूर्णपणे एकाग्र होऊन प्रयत्न करू लागला.

मग मनगटाला एक झटका देऊन त्याने एक उभी सरळ रेषा काढली. पुढे ती रेषा वळली आणि बेडौलपणे खालच्या दिशेत कलंडली.

“मला कॅलिग्राफी खूप आवडते,” दाओजी म्हणाला.

“पण ही कॅलिग्राफी नाही,” शिक्षक उसासा टाकत म्हणाले.




दर दिवशी दाओजीचा ब्रश काहीतरी नवीन, आश्चर्यचकित करणारे चित्र रेखाटू लागला.



त्याच्या सरळ रेषा झाडांच्या फांद्या तर वक्ररेषा माशांचे गळ बनू लागले.

त्याचे ठिपके डोळे बनू लागले. त्यातून त्याने कधी डुक्कर तर कधी माकड रेखाटले. त्याने ब्रशच्या एका फटकाऱ्यात हवेत झुलणारी घोड्याची शेपूट रेखाटली.

दाओजी मंदिरे, चहाची दुकाने, रेशीम बाजार येथील भिंतींवर चित्रे रेखाटू लागला. शहराच्या सभोवताली असलेल्या मोठ्या भिंतिवरही त्याने वाऱ्यावर डोलणारी रोपटी, ढगांवर तरंगणारा बुद्ध अशी चित्रे काढली.



त्याची चित्रे पाहून लोक वेडावले.


“अप्रतिम!” हमाल खुर्चीतील स्त्री उद्गारली.


“छान भेट दिलीस आम्हाला,” एक नन् म्हणाली.

“बुद्धाच्या बाह्या कशा छान फडफडतायत!” पतंगवाला मुलगा म्हणाला.

दाओजीने चित्र एवढ्या जलदगतीने रेखाटले होते की बुद्धाच्या बाह्या खरोखरच फडफडत्या पंखांसारख्या भासत होत्या.

दाओजी आता *फडफडत्या बाह्यां*चा चित्रकार म्हणून ओळखला जाऊ लागला. त्याचे चाहते भेट म्हणून त्याच्या चित्रासमोर नाणी, तांदूळ, फळे आणि कोंबडी ठेवू लागले.





दाओजी तडक मठात जाऊन या भेटवस्तू गरीबांना वाटून टाकू लागला. यामुळे भिक्षुक संतुष्ट होऊ लागले.



दर दिवशी दाओजी मनाचे पूर्ण समाधान होईपर्यंत चित्र रेखाटत बसे. एक डोळा विस्फारून, दुसऱ्या डोळ्यात स्वप्न घेऊन तो चित्रे रेखाटू लागला. या कामात त्याचे एवढे भान हरपले की तो दिवसरात्र, तहानभूक, वेदना, दु:ख हे सारे विसरून गेला.

ऋतू बदलत गेले.
दाओजी चित्रे काढत गेला, अधिकाधिक आनंद मिळवत गेला.
एके दिवशी त्याने एक संदर, नाजूक फुलपाखरू रेखाटले. दाओजीची नजर त्याच्यावर खिळून राहिली.
त्याला ते फुलपाखरू खरे असल्याचा भास झाला.
मग वाऱ्याची एक झुळुक आली आणि फुलपाखराचे पंख किंचितसे फडफडले.
“हे काय?” तो आणखी नजिक गेला. मग अचानक फुलपाखरू उडाले आणि जळत्या कागदासारखे हवेत तरंगू लागले.
“अरे!” दाओजी उद्गारला.
“इथे तर खरं फुलपाखरू येऊन बसलं होतं. म्हणजे, मी फुलपाखराचं चित्र कल्पनेत काढलं वाटतं.”



लगेच दाओजीने आणखी एक फुलपाखरू रेखाटले. हे फुलपाखरू *मॅजेस्टीक लेपर्ड लेसविंग* प्रजातीचे होते.
या फुलपाखराचे पंख भर दुपारच्या उन्हात चमचमू लागले.

दाओजीने डोळे मिचकावले.
फुलपाखरानेही डोळे मिचकावले.

पण त्याने फुलपाखराच्या चित्राला स्पर्श करण्याचा प्रयत्न करताच फुलपाखरू उडून गेले.
दाओजी ओरडला, “परत ये. तू माझं चित्र आहेस.”
पण फुलपाखरं कधी कुणाचं ऐकतात का?




मग दाओजीने लगेच एका उंटाचे चित्र काढले आणि ते पाहाण्यासाठी तो भिक्षुकांना बोलवायला गेला.

पण परतल्यावर पाहिले तर चित्रातील उंट गायब होता.



“मी रेखाटलेला उंट एवढा खरा वाटतो की तो चालत दूर जाऊ शकतो!” दाओजी म्हणाला.

भिक्षुकांनी मान हलवली. “बढाई मारण्यापेक्षा चित्र काढ,” एक भिक्षुक म्हणाला.




त्या दिवशी दाओजीला नाणी, तांदूळ या भेटवस्तू मिळाल्या नाहीत. शहराची मोठी भिंत उघडी-बोडकी दिसू लागली. दाओजीच्या ब्रशच्या फटकाऱ्यांचा भिंतिवर होणारा आवाज मात्र लोकांना ऐकू येत होता.

दाओजीने काढलेले पक्षी पंखांची फडफड करत उडून जाऊ लागले. त्याने काढलेले घोडे चौफेर उधळत पर्वतांमध्ये लुप्त होऊ लागले. त्याने काढलेल्या घोडागाड्या रस्त्यावर पळू लागल्या आणि शहराबाहेर जाऊ लागल्या. त्याची सगळी चित्रे गायब होऊ लागली.

दाओजीला रडू आले.
लहान मुलांव्यतिरिक्त त्याचे सारे चाहते गायब झाले होते.

“इथे बघा, दाओजीचं कबूतर माझ्या डोक्यावर येऊन बसलंय!” एक भिकारी मुलगा ओरडला.



“मी दाओजीच्या किटकांसारखा आवाज काढू शकते,” एक भिकारी मुलगी ओरडली. “चिर्रssss! चिर्रsssss!”


फाटक्या कपड्यांतील अनवाणी भिकारी मुले दाओजीमागोमाग जाऊ लागली. त्यांनी दाओजीभोवती कडे केले. दाओजीचे चित्र काढून पूर्ण होईपर्यंत मुले आपली तहान-भूक विसरून ऊभे राहिले.



वर्षांमागून वर्षे गेली. दाओजीच्या चाहत्यांची संख्या वाढतच गेली. त्याच्या मागोमाग फिरणारी मुले आता स्वत:च्या मुलांना दाओजीच्या चित्रकलेचा चमत्कार बघायला नेऊ लागले.

दाओजी तेथील पवित्र मंदिरात भगवान बुद्धाचे तेजोमंडळ रेखाटू लागला. ते पाहाण्यास मंदिराच्या प्रमुख प्रवेशद्वारावर लोकांची मोठी गर्दी होऊ लागली.

दाओजीचा ब्रश एखाद्या धुमकेतूसारखा तळपत चपळाईने फिरत होता. ते पाहून लोक आश्चर्याने थक्क झाले.



मंदिराच्या आतील भागात दाओजीने पाच ड्रॅगन रेखाटले. त्यांची खवलेयुक्त शरीरे भरारी घेत असल्याचा भास होऊ लागला. आपल्या कल्पनेतील पर्वतराजींमधून वाहाणारे धबधबे दाओजीने शहरातील साऱ्या मंदिरांमध्ये रेखाटले. त्याची चित्रे पाहून कुणीतरी म्हणाले, “व्वा! हा माणूस कुणी साधासुधा चित्रकार नाही. नक्कीच त्याच्याकडे *देवाचा कुंचला (ब्रश)* आहे.”




एके दिवशी सम्राट स्वत: मंदिरात आला. तेथील चित्रातील पाच ड्रॅगन खरे समजून त्याने तलवार उपसली, रोपट्याची फुले खरी समजून त्यांचा वास घेतला, वाहात्या झऱ्याचे पाणी पिण्यासाठी हातात घेण्याचा प्रयत्न केला.

अखेरीस सम्राट म्हणाला, “राजवाड्याची संपूर्ण भिंत मी चित्र काढण्यासाठी तुझ्या हवाली करतो. चित्र पूर्ण होईपर्यंत ते कुणी पाहाणार नाही.” दाओजीसाठी हा मोठा सन्मान होता. तो नम्रपणे झुकला.



पण सर्वोत्कृष्ट चित्र काढण्यात अनेक वर्षे निघून गेली. दाओजीने चित्र पूर्ण केले तेव्हा तो वृद्ध झाला होता.

सरतेशेवटी, सर्वोत्कृष्ट चित्राचे राजेशाही
थाटात अनावरण करण्याचा सोहळा
सुरू झाला. यावेळी सातशे वाद्ये
असलेल्या वाद्यवृंदाने वादन केले.



सोहळ्याअखेरीस, चित्रावरचा पडदा दूर करण्यात आला. चित्रातील पर्वत जणू आभाळ चिरून वर गेलेले दिसत होते, बांबूची झाडे वाऱ्यावर डोलत होती, पक्षी आभाळात आनंदाने विहरत होते, घोडे कुरणावर मुक्तपणे उधळत होते. मनाला टवटवी देणाऱ्या अनेक गोष्टी चित्रात होत्या. चित्र नुकतेच आभाळातून पडलेल्या बर्फासारखे तजेलदार दिसत होते. लोक स्तिमित झाले. सम्राटाने मान झुकवली. चंद्र आसवे ढाळू लागला.

चंद्राच्या रुपेरी अश्रूंमध्ये चिंब भिजलेल्या चित्रकाराने चित्रात एक लुकलुकती कमान आणि त्यातून जाणारी वाट काढली. मग तो मोठ्याने म्हणाला,

"या कमानीच्या पल्याड स्वर्ग आहे. माझ्या मागोमाग या."





आणि कुणी पाऊल पुढे टाकण्याच्या आधीच *देवाचा कुंचला* मिळालेला
हा माणूस थेट त्या कमानीतून चित्रात शिरला आणि नाहीसा झाला..



*वू दाओजी*चा मृत्यू झाला नाही, तो फक्त आपल्या अंतिम चित्रात विलिन झाला, अशी दंतकथा आहे. सम्राट *युआनश्वांग*ने वू दाओजीला सर्वोत्कृष्ट चित्र काढण्यास सांगितले तेव्हा दाओजीने एक रमणीय निसर्गदृश्य रेखाटले. वू दाओजी बेपत्ता झाला, याबाबत वेगवेगळ्या कहाण्या आहेत. काही लोकांच्या मते, वू दाओजीने मृत्यूला चकवले.

